महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

MCAER
कृषि परिषद

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com
वेबसाईट : www.mcaer.org

दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.
फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.


## कृषी विद्यापीठांतर्गत आचार्य पदवी प्रवेश सूचना २०१८-१९

महाराष्ट्र राज्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी व डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली या चारही कृषी विद्यापीठांतर्गत सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता खाली नमूद केलेल्या आचार्य पदवी अभ्यासक्रमास प्रवेशासाठी इच्छुक उमेदवारांकडून प्रवेश माहिती पुस्तिका २०१८-१९ मधील सूचनेनुसार ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेमार्फत केंद्रीय पध्दतीने राबविण्यात येत आहे. अभ्यासक्रमाचे माध्यम इंग्रजी राहील.

१. उपलब्ध विद्याशाखा

| अ.क्र. | अभ्यासक्रम | अ.क्र. | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|
| (१) | पीएच.डी. (कृषी) | (२) | पीएच.डी. (गृहविज्ञान) |
| (३) | पीएच.डी. (मत्स्यशास्त्र) | (४) | पीएच.डी. (कृषी जैव तंत्रज्ञान) |
| (५) | पीएच.डी. (कृषी अभियांत्रिकी) | (६) | पीएच.डी. (अन्न तंत्रज्ञान) |

२. प्रवेश पात्रता, महाविद्यालय, प्रवेश क्षमता, आरक्षण, प्रवेश कार्यपध्दती इत्यादी सविस्तर तपशिलाचा अंतर्भाव असलेली शैक्षणिक वर्ष २०१८-१९ ची आचार्य पदवी प्रवेश माहिती पुस्तिका व ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करण्याची सुविधा **दि. २४ सप्टेंबर,२०१८** पासून **www.mcaer.org** व **www.maha-agriadmission.in** या संकेतस्थळांवर उपलब्ध असेल. प्रवेशोच्छुकांनी सदर संकेतस्थळावरून प्रवेश माहिती पुस्तिका प्राप्त करून घ्यावी. प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबवावयाची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे आहे.

Scanned by CamScanner

Jvt17

प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबवावयाची कार्यपध्दती-

- उमेदवारांने **maha-agriadmission.in** या संकेतस्थळाद्वारे दि. ०१ ऑक्टोबर,२०१८ पर्यंत ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावा. यानंतर प्रवेश अर्ज भरण्याची सुविधा संकेतस्थळावर उपलब्ध नसेल.
- 'ऑन लाईन' भरतांना उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र, उमेदवाराची स्वाक्षरी, आवश्यक ती संबंधित कागदपत्रे स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड करावीत.
- प्रवेश अर्ज किंवा कागदपत्रे हातबटवडयाने / टपालाने / कुरीअरने पाठवू नयेत.
- प्रवेश अर्ज भरतेवेळी प्रवेश अर्जाचे शुल्क डेबिट कार्ड, क्रेडीट कार्ड किंवा नेट बँकीगद्वारे भरावे.

प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी भरावयाचे शुल्क-

खुल्या प्रवर्गासाठी रु. २०००/-

आरक्षित प्रवर्गासाठी रु. १०००/- (अ.जा., अ.ज., वि.जा*, भ.ज*, इ.मा.व*, वि.मा.व*.)

[*उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य.]

पात्र असलेल्या प्रवेशोच्छुक उमेदवारांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी उक्त संकेतस्थळावरील माहिती पुस्तिकेचे आकलन करून विहित वेळेत ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करावेत.

क्र. मकृप/शिक्षण-१/५९१८/
दिनांक- सप्टेंबर,२०१८

(सचिन्द्र प्रताप सिंग)
महासंचालक
महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे